# ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप. बँक लि; हिंगोली

(मल्टीस्टेट बँक)

**मुख्य कार्यालय, मेन रोड, हिंगोली जि. हिंगोली - ४३१५१३ (महाराष्ट्र)**

फोन क्र. ९१७२०४६९५५

# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त बँकेच्या सभासदांसाठी)**

बँकेच्या सर्व भागधारकांना कळविण्यात येते की, बँकेची **४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक ०६/०८/२०२३** रोजी सकाळी ११.३० वाजता बँकेचे अध्यक्ष **मा.श्री. प्रकाशचंदजी सोनी** यांच्या अध्यक्षतेखाली हिंगोली येथे दर्शविलेल्या ठिकाणी खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलाविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेचे ठिकाण :- महावीर भवन, रामलीला मैदान, हिंगोली**

**सभेपुढील विषय :-**

१. दिनांक ०७/०८/२०२२ रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. दिनांक ३१/०३/२०२३ अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजुरी देणे.

३. सन २०२२-२०२३ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.

४. मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार सन २०२२-२३ या वर्षाच्या नफ्याचे वाटप करणे .

५. सन २०२२-२३ सालात अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.

६. मा. संचालक मंडळाने सूचविलेल्या सन २०२३-२४ सालच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

७. वर्ष २०२३-२४ करीता वैधानिक तपासनिसांची नियुक्ती करणे.

८. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षा करीता बँकेने कंकरट तपासणीस यांची नियुक्ती के ली आहे त्यास मान्यता देणे.

०९ वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे बाबत.

१०. मा. अध्यक्ष साहेब यांचे परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयांवर विचार करणे.

ठिकाण - हिंगोली　　　　संचालक मंडळाच्या आदेशानुसार

दिनांक - २०/०७/२०२३

**दिलीप वेल्हाणकर**

(व्यवस्थापकीय संचालक)

**विशेष सूचना :-**

१. गणसंख्येच्या कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२. सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस येतांना आपल्या अहवालाची प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

३. बँकेच्या कामकाजाविषयी प्रश्न विचारावयाचे असल्यास सभेच्या तारखेपुर्वी आठ दिवस आधी बँकेच्या मुख्य कार्यालयात ते लेखी सादर करावेत. मुदतीनंतर आलेले प्रश्न विचारात घेतले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

नोट- सर्व सभासदांना वार्षिक अहवाल पाठविण्यात आला आहे. अनावधानाने न मिळाल्यास कृपया जवळच्या शाखेतून प्राप्त करावा ही विनंती.